0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक ३०/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.१९७, दिनांक ३१/०३/२०१२, ०९/०४/२०१२, १९/०४/२०१२ व २४/०४/२०१२.

३) या कार्यालयाचे "आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.२७७, दिनांक ३०/०४/२०१२.

४) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. १०२६२/२०१२ अन्वये पारीत केलेले आदेश.

५) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.९०५, दिनांक १५/१२/२०१२, ०५/०१/२०१३ व २३/०१/२०१३.

६) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी व मे. स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया लि. यांचे दिनांक २२/०१/२०१३ रोजीचे प्राप्त स्वतंत्र लेखी निवेदने.

७) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.७८ दिनांक २३/०१/२०१३.

८) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा.१०९ दिनांक ०४/०२/२०१३.

९) अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे पत्र क्र. एफटीएल/एफडीए/११(२)/१३ दिनांक २२/०२/२०१३ अन्वये प्राप्त पृथ:करण अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२४/२०१२/जा. २०७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.

दिनांक : १५/०३/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २८/०३/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी पथक व पंचांसह मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी, ९/१२, चिराग हाऊस, सेक्टर १८, गोकूळ डेअरी जवळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५ येथे भेट देऊन तपासणी केली असता, तपासणीच्या वेळी दिनांक २८/०३/२०१२ रोजीचे

साठापुस्तक अद्यावत नव्हते. तथापी, मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी नेमलेल्या मे. सुप्रिटेन्डेन्स कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या कंपनी मार्फत दैनिकरित्या सुटा व बॉक्समधील पामतेलाच्या साठ्याची मोजदाद करण्याची जबाबदारी असलेल्या कंपनीच्या दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या दैनिक अहवालानुसार पामतेलाचा सुटा साठा ७४.९१० मे. टन तसेच ६८२५३ पामतेलाचे बॉक्स दिनांक २८/०३/२०१२ रोजी सकाळी शिल्लक असल्याचे आढळले. त्यानुसार सदरहू कंपनीच्या सर्वेअर मार्फत मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांच्या नमूद दोन्ही गोदामांवर असलेल्या पामतेलाच्या बॉक्सचे पंचांसमक्ष मोजदाद केली असता, एकूण ७३९२२ पामतेलाचे बॉक्स आढळून आले व तसे उपस्थित सर्वेअर यांनी प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आलेल्या तपासणी अहवालावर स्वाक्षरीसह प्रमाणित केले आहे. तपासणीच्या वेळी दिनांक २८/०३/२०१२ रोजीचे साठापुस्तक अद्यावत नसल्याने प्राथमिक शिल्लक म्हणून ७४.९१० मे. टन व दिवसभेरातील सुट्या पामतेलाची ५९.९६० मे. टन असे मिळून एकूण १३४.८७० मे. टन साठ्यामधून प्रत्यक्षात टाक्यांमधील मोजदाद केलेला ५० मे. टन साठा वजा करुन पामतेल पॅकिंगसाठी वितरणाची आकडेवारी ८४.८७० मे. टन काढण्यात आली. त्यानुसार सदर साठयाचे पामतेलाच्या बॉक्समध्ये रुपांतरीत करुन दिनांक २८/०३/२०१२ नव्याने पॅकिंग केलेल्या बॉक्सची संख्या ६२१७ आढळून आली. दिनांक २८/०३/२०१२ रोजी पामतेलाच्या बॉक्सची प्राथमिक शिल्लक म्हणून दर्शविण्यात आलेली ६८२५३ बॉक्समध्ये दिवसभरातील पॅकिंग झालेल्या ६२१७ बॉक्सची संख्या जमा करुन एकूण ७४४७० पामतेलाच्या बॉक्समधून दिवसभरातील वितरण आदेशानुसार वितरीत झालेला ३४२१ बॉक्सची संख्या वजा जाता ७१०४९ पामतेलाचे बॉक्स शिल्लक असणे अपेक्षित होते. तद्नंतर मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या सर्वेअर मार्फत प्रत्यक्षात मोजदाद केलेल्या संपूर्ण बॉक्सेसची संख्या ७३९२२ मधून पुस्तकी शिल्लक ७१०४९ बॉक्सचा साठा वजा जाता २८७३ बॉक्स म्हणजेच ३९.२१ मे. टन साठा अतिरिक्त आढळून आला आहे.

अशाप्रकारे मे. सप्तश्रृंगी कंपनी यांनी मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन तसेच पर्यायाने शासनाकडून सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत होणारा अनुदानित दराचा पामतेलाचा साठा पॅकिंग करुन वितरणाची जबाबदारी देण्यात आली असता त्यांनी सदरच्या तपासणीमध्ये आढळून आलेले २८७३ पामतेलाचे बॉक्स (३९.२१ मे. टन) एवढे अतिरिक्त पामतेलाचा साठा त्यांनी संबंधित जिल्ह्यांना पूर्णपणे वितरीत न करता तो गैरमार्गाने व काळाबाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने स्वत:जवळ बाळगून ठेवल्याने त्यांनी मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन सोबतच्या करारनाम्यातील अटींचा भंग करुन शासनाची विश्वासार्हता गमावल्याने तसेच पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १० व शासकीय कामकाजात वारंवार अडथळा निर्माण केल्याने भारतीय दंड विधान चे कलम १८६ चा भंग

CONTROLLER OF RATIONING
HEAD O
MUMB

केल्यावरुन संबंधितांविरुध्द ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. II २७/२०१२ दिनांक २९/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन २८७३ बॉक्स मधील ३९.२१ मे. टन पामतेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याकरिता जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना दिनांक ३१/०३/२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा वाचावे क्रमांक २ अन्वये मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०४/०४/२०१२, १७/०४/२०१२, २४/०४/२०१२ तसेच मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांनी दिनांक २३/०४/२०१२ रोजी सादर करण्यात आलेल्या पत्रामध्ये त्यांनी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी केलेल्या विनंतीनुसार नैसर्गिक न्याय म्हणून त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २६/०४/२०१२ रोजी ठेवण्यात आली. अशाप्रकारे सर्व संबंधितांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे सादर करण्यासाठी पुरेशी संधी देवून सदर प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी या कंपनीस मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन तसेच पर्यायाने शासनाकडून सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत होणारा अनुदानित दराचा पामतेलाचा साठा पॅकिंग करुन वितरणाची जबाबदारी देण्यात आली असता त्यांनी सदरच्या तपासणीमध्ये आढळून आलेले २८७३ पामतेलाचे बॉक्स (३९.२१ मे. टन) या अतिरिक्त पामतेलाचा साठा त्यांनी संबंधित जिल्ह्यांना विहीत परिमाणामध्ये पूर्णपणे वितरीत न करता तो गैरमार्गाने व काळाबाजारी करण्याच्या उद्देशाने स्वत:जवळ बाळगून ठेवल्याने त्यांनी मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन सोबतच्या करारनाम्याच्या अटींचा भंग करुन शासनाची विश्वासार्हता गमावल्याने पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, नमुद गुन्हयामधील अतिरीक्त आढळून आलेल्या २८७३ बॉक्स मधील ३९.२१ मे.टन पामतेलाचा साठा हा जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार या कार्यालयास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये शासनजमा करुन अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रीत दराने विक्री करण्याकरीता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करण्याचे आदेश वाचावे क्र. ३ अन्वये दिनांक ३०/०४/२०१२ रोजी पारीत करण्यात आले.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाकडून पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. १०२६२/२०१२ दाखल केले. सदर रिट

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... ICE

पिटीशनच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १९/११/२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये शासनास तसेच पर्यायाने या कार्यालयास जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये नव्याने कार्यवाही करण्यास मोकळीक असुन सर्व संबंधितांना जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-ब अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची संधी देण्यात यावी असे नमुद आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारीत केलेल्या आदेशानुसार मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालक तसेच मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे व्यवस्थापक यांना जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चे कलम ६-ब अंतर्गत वाचावे क्र. ५ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून सर्व संबंधितांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी दिनांक ०२/०१/२०१३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. तथापी, मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी तसेच मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. च्या वतीने टपालामार्फत सादर केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली.

सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २२/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली. तथापी, दिनांक २२/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. यांच्या वतीने श्री. सुरेश कुमार, उपव्यवस्थापक हे उपस्थित राहिले, त्यांना नोटीसमधील मुद्यांच्या अनुषंगाने आवश्यक पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यास सुचित केले असता, त्यांना त्यांच्या कंपनीच्या वतीने सुनावणीस प्राधिकृत केले नसल्याचे सांगून त्याकरिता कंपनीचे डेप्युटी जनरल मॅनेजर यांना प्राधिकृत केल्याची माहिती त्यांनी त्यांच्या कार्यालयात दुरध्वनी करुन प्राप्त करुन दिली व कंपनीचे लेखी निवेदन टपालामार्फत सादर करणार असल्याचे सांगितले. तसेच मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालक यांच्या वतीने श्री. महेश राठी यांनी प्राधिकारपत्रासह उपस्थित राहिले नाहीत. तथापी, तद्नंतर फॅक्स संदेशद्वारे प्राधिकारपत्र प्राप्त करुन लेखी निवेदन टपालामार्फत सादर करणार असल्याचे सांगितले.

सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २९/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली. दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे व्यवस्थापक श्री. जे.जे. सुर्वे, उपमहाव्यवस्थापक श्री. पॉल क्रिस्टोफर व उपव्यवस्थापक श्री. सुरेशकुमार यांनी यापूर्वी टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. सदर सुनावणीस उपस्थितांनी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी हे मागील तीन वर्षापासून पामतेलाच्या पॅकींगसाठी करारबध्द असल्याचे सांगितले. उपस्थित अधिकाऱ्यांना सदरहू कंपनीत असलेल्या लोखंडी टाक्यांचे कॅलिब्रेशन नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता, सदर बाब मान्य केली. मे. श्री सप्तश्रृंगी सोबतच्या करारनाम्यातील अटींमध्ये लोखंडी टाक्यांच्या कॅलिब्रेशनबाबत उल्लेख असून त्याची पूर्तता

करुन घेण्याची संबंधित मे. एस.टी.सी. च्या अधिकाऱ्यांची जबाबदारी असताना त्यांनी हेतूपुरस्सर दुर्लक्ष्य केल्याचे दिसून येते. मे. एस.टी.सी. च्या उपस्थित अधिकाऱ्यांना त्यांच्या वतीने मे. श्री. सप्तश्रृंगी या पॅकर असलेल्या कंपनीची तपासणी केली जाते किंवा कसे, याबाबत विचारणा केली असता, अधिकाऱ्यांनी वित्तीय वर्षाअखेर पॅकर कंपनीची तपासणी घेणे बंधनकारक असल्याचे सांगून तपासणीमध्ये मे. सुप्रीटेंडेन्स या सर्वेअर कंपनीच्या दैनिक अहवालानुसार रॅन्डम तपासणी करीत असल्याचे सांगितले. यावरुन मे. एस.टी.सी. चे अधिकारी हे केवळ तपासणीकरीता नमूद कंपनीत धावती भेट देऊन सोपस्कर पूर्ण करीत असल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त सर्व बाबी उपस्थित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन कॅलिब्रेशन नसलेल्या लोखंडी टाक्यांमध्ये साठवणूकीचा अंदाज नसल्याने सदर धाडीत गैरमार्गाने साठवणूक केलेला अतिरिक्त पामतेलाचा सुटा साठा आढळून आल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता, उपस्थितांनी वरील सर्व बाबींबाबत समाधानकारक उत्तरे दिले नाहीत. या बाबी सांशंकता निर्माण करणाऱ्या असून त्यामुळे मे. एस.टी.सी. चे संबंधित अधिकारी यांच्या विरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत कारवाई करण्यासाठी वाचावे क्र. ८ अन्वये उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना पत्र निर्गमित करुन शासनाचे वतीने पुरवणी फिर्याद नोंदविणेबाबत निर्देशित केले आहे.

सदर प्रकरणी जप्त केलेला मुद्देमाल हा पामतेलाचा पॅकबंद पिशव्यांमधील साठा सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाचा असून सदरचा साठा हा नाशवंत असल्याने तो खराब झाल्यास शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची तसेच त्यामुळे गोरगरीब शिधापत्रिकाधारक हे त्यापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापी, सदर पामतेलाचा साठा हा माहे मार्च २०१२ पासून साठवणूक केला असल्याने आदेश पारीत करण्यापूर्वी सदर पामतेलाचा साठा हा मानविय खाण्यास योग्य आहे किंवा कसे ? याची खातरजमा करण्याकरिता जप्त साठ्यातील नमुने घेण्यात येऊन वाचावे क्र. ७ अन्वये सदर नमुने अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांना पाठविण्यात आले. सदर नमुन्यांचा पृथ:करण अहवाल वाचावे क्र. ९ अन्वये अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचेकडून प्राप्त झाला असून सदर अहवालामध्ये " I am of the opinion that above sample palm oil (O-78) confirm to the standards of palm oil as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011", असे नमूद आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखुन ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद :-</u>

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांचे वतीने प्राप्त निवेदनात, त्यांच्या गोदामातील पामतेलाचा साठा हा पूर्णपणे मे. एसटीसी या कंपनीच्या मालकीचा असुन सदर कंपनीस केंद्रशासनाने खाद्यतेल व कडधान्याचा साठा आयात करुन विविध राज्यांना सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरणासाठी नेमले आहे. कंपनीतील पॅकेजींगच्या प्रक्रियेमध्ये उपयोगात आणलेल्या मशिन करीता केंद्र शासनाच्या आदेशानुसार कॅलिब्रेशनची गरज नाही. पॅकेजिंगची प्रक्रिया ही वजनावर आधारीत असुन त्यांच्या कंपनीस मे. एसटीसी कडून प्राप्त सुटा साठयाच्या अनुषंगाने तेवढया वजनाच्या साठयाचे पॅकींगमध्ये रुपांतरीत करुन वितरणासाठी ते नमुद कंपनीबरोबर करारबध्द आहेत. सदर प्रक्रिया मे. एसटीसी तसेच त्यांनी नेमुन दिलेल्या सर्व्हेअर कंपनी समक्ष होत असुन त्याबाबतचा दैनिक अहवाल संयुक्त स्वाक्षरीसह प्रमाणित करुन मे. एसटीसी यांचेकडे सादर करण्यात येत आहे. सदर तपासणीचे वेळी अतिरीक्त दर्शविलेला पामतेलाच्या बॉक्समधील साठा हा प्रत्यक्षात अतिरीक्त नसुन त्यांच्या कंपनीवर जाणुनबुजुन चुकीचे आरोप केले आहेत. मे. एसटीसी यांनी नेमलेल्या सर्व्हेअर कंपनीमार्फत नियमितरित्या पामतेलाच्या सुटा व बॉक्समधील साठयाची मोजदाद करुन दैनिकरित्या अहवाल तयार केला जात आहे. सदरचा साठा हा सर्व्हेअर कंपनी तसेच एसटीसी कंपनीच्या अधिकाऱ्यांमार्फत प्रमाणित केला असुन याबाबत मे. एसटीसी या कंपनीकडून त्यांच्या कंपनीने कोणत्याही कराराचा भंग केला नसल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे याप्रकरणी पुन्हा पडताळणी करुन त्यांना या आरोपातुन मुक्त करण्यात यावे अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. एसटीसी या कंपनीच्यावतीने प्राप्त निवेदनात, भारत सरकारने काही एजन्सीजना आरबीडी पामोलिन आयात करुन तो सार्वजनिक वितरण प्रणालीवर विविध राज्यांना वितरण करण्यासाठी नेमले आहे. त्याअनुषंगाने मे. एसटीसी या कंपनीस महाराष्ट्र राज्यामध्ये सदर कामी प्राधिकृत केले आहे. मे. एसटीसी ही कंपनी महाराष्ट्र शासनासोबत पामतेलाच्या वितरणाकरीता पाच वेळा करारबध्द झाली असुन त्यापैकी शेवटचे करार दिनांक ०२/११/२०११ रोजी मार्कफेड यांच्या सोबत ३०,००० मे. टनासाठी झाले आहे. मे. एसटीसी या कंपनीने दिनांक ०९/०९/२००९ रोजी मे. सप्तश्रृंगी कंपनी यांचेबरोबर पामतेलाच्या पॅकिंगसाठी करारनामा केला आहे. सदर पॅकिंगच्या प्रकियेवर साठयाची मोजदाद करण्यासाठी व देखरेखीसाठी मे. सुपरीटेंडेंस कंपनी ऑफ इंडीया प्रा. लि. या कंपनीसोबत करारनामा करुन दिनांक ०१/०२/२०१२ रोजीच्या कार्य आदेशान्वये नमुद कंपनीस प्राधिकृत केले आहे. मे. सप्तश्रृंगी या कंपनीकडून दिनांक २८/०३/२०१२ रोजी सुमारे दोन वाजता त्यांना माहिती मिळाली की, नियंत्रक शिधावाटप यांच्या अधिपत्याखालील पथक हे तपासणीसाठी नमुद आस्थापनेत उपस्थित झाले आहे. सदर

CONTROLLER OF RATIONING
HEAD

कंपनीत सार्वजनिक वितरण प्रणालीद्धारे वितरीत करावयाचा आरबीडी पामोलिन ऑईलच्या साठयाची साठवणुक केली आहे. सदर तपासणीची प्रक्रिया त्यांच्या कंपनीच्या अनुपस्थित झाली असुन नमुद गोदामावरील साठवणुक केलेला साठा हा त्यांच्या कंपनीच्या मालकीचा आहे. तद्नंतर दिनांक २९/०३/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजता सदर पथकाने पुन्हा भेट देवून तपासणीला सुरवात केली. त्यावेळेस स्टोअरकिपर यांनी सर्व्हेअर कंपनीच्या सुपरवायझर यांना मोजदादच्या प्रक्रियेत पाचारण करण्याची विनंती केली. त्या अनुषंगाने उपस्थित झालेल्या सर्व्हेअर यांनी पामतेलाच्या बॉक्सची मोजदाद केली. तद्नंतर त्यांच्या कार्यालयास अवगत झाले की, नमुद कंपनीतील २८७३ बॉक्सचा साठा पथकाने जप्त केला आहे. दिनांक ०२/०४/२०१२ रोजी मे. एसटीसीच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ३१/०३/२०१२ अखेर कंपनीमधील संपूर्ण साठयाची मोजदाद केली असता नमुद कंपनीत अतिरीक्त साठा आढळून आला नसल्याचे निदर्शनास आले आहे. जप्त करण्यात आलेला २८७३ बॉक्समधील पामतेलाचा साठा हा मार्कफेड यांना वितरीत करावयाचा होता परंतु साठा जप्त असल्याने त्यांना शक्य झाले नाही. मे. सप्तश्रृंगी हे सुटा साठयाचे रुपांतरीत पिशव्यांमध्ये करण्याची निरंतर प्रक्रिया असुन सदर प्रक्रियेमध्ये साठयामधील फरक आहे किंवा कसे? याची प्रक्रियेअखेर निष्कर्ष काढणे योग्य आहे. त्यामुळे दिनांक २८/०३/२०१२ रोजी दर्शविलेला अतिरीक्त साठा हा वस्तुस्थितीच्या आधारे नाही. सदर वस्तुस्थिती पहाता जप्त केलेला पामतेलाचा साठा हा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २८/०३/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी पथक व पंचांसह मे. श्री सप्तश्रृंगी ऑईल कंपनी, ९/१२, चिराग हाऊस, सेक्टर १८, गोकूळ डेअरी जवळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०५ येथे भेट देऊन तपासणी केली असता, तपासणीच्या वेळी दिनांक २८/०३/२०१२ रोजीचे साठापुस्तक अद्यावत नव्हते. तथापी, मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिं. यांनी नेमलेल्या मे. सुप्रिटेन्डेन्स कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या कंपनी मार्फत दैनिकरित्या सुटा व बॉक्समधील पामतेलाच्या साठ्याची मोजदाद करण्याची जबाबदारी असलेल्या कंपनीच्या दिनांक २८/०३/२०१२ रोजीच्या अहवालानुसार पामतेलाचा सुटा साठा ७४.९१० मे. टन तसेच ६८२५३ पामतेलाचे बॉक्स दिनांक २८/०३/२०१२

रोजी सकाळी शिल्लक असल्याचे आढळले. त्यानुसार सदरहू कंपनीच्या सर्वेअर मार्फत मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी यांच्या नमूद दोन्ही गोदामांवर असलेल्या पामतेलाच्या बॉक्सचे पंचांसमक्ष मोजदाद केली असता, एकूण ७३९२२ पामतेलाचे बॉक्स आढळून आले व तसे उपस्थित सर्वेअर यांनी प्रत्यक्ष मोजदाद करण्यात आलेल्या तपासणी अहवालावर स्वाक्षरीसह प्रमाणित केले आहे. तपासणीच्या वेळी दिनांक २८/०३/२०१२ रोजीचे साठापुस्तक अद्यावत नसल्याने प्राथमिक शिल्लक म्हणून ७४.९१० मे. टन व दिवसभरातील सुट्या पामतेलाची ५९.९६० मे. टन असे मिळून एकूण १३४.८७० मे. टन साठ्यामधून प्रत्यक्षात टाक्यांमधील मोजदाद केलेला ५० मे. टन साठा वजा करुन पामतेल पॅकिंगसाठी वितरणाची आकडेवारी ८४.८७० मे. टन काढण्यात आली. त्यानुसार सदर साठयाचे पामतेलाच्या बॉक्समध्ये रुपांतरीत करुन दिनांक २८/०३/२०१२ नव्याने पॅकिंग केलेल्या बॉक्सची संख्या ६२१७ आढळून आली. दिनांक २८/०३/२०१२ रोजी पामतेलाच्या बॉक्सची प्राथमिक शिल्लक म्हणून दर्शविण्यात आलेली ६८२५३ बॉक्समध्ये दिवसभरातील पॅकिंग झालेल्या ६२१७ बॉक्सची संख्या जमा करुन एकूण ७४४७० पामतेलाच्या बॉक्समधून दिवसभरातील वितरण आदेशानुसार वितरीत झालेला ३४२१ बॉक्सची संख्या वजा जाता ७१०४९ पामतेलाचे बॉक्स शिल्लक असणे अपेक्षित होते. तद्नंतर मे. एस.टी.सी. कॉर्पोरेशनच्या सर्वेअर मार्फत प्रत्यक्षात मोजदाद केलेल्या संपूर्ण बॉक्सेसची संख्या ७३९२२ मधून पुस्तकी शिल्लक ७१०४९ बॉक्सचा साठा वजा जाता २८७३ बॉक्स म्हणजेच ३९.२१ मे. टन साठा अतिरिक्त आढळून आल्याने मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी विरुध्द गुन्हा दाखल करुन २८७३ बॉक्स मधील ३९.२१ मे. टन पामतेलाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशानुसार या कार्यालयाकडून प्राथम्याने कारणे दाखवा नोटीस बजावुन सुनावणी ठेवण्यात आली. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, उक्त कंपन्या हे निवेदनाचे सबब सांगून सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती करीत असल्याचे दिसुन आले. सदर सुनावणीस मे. एसटीसी या कंपनीच्या वतीने प्राधिकृत प्रतिनिधींना पाचारण न करता या कार्यालयाच्या तसेच पर्यायाने शासनाच्या बहुमुल्य वेळेचा अपव्यय करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. कंपनीचे अधिकारी सर्वश्री. जयप्रकाश सुर्वे, सुरेश कुमार व पॉल क्रिस्टोफर यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, गुन्ह्यामधील जप्त असलेले २८७३ पामतेलाचे बॉक्स मुक्त करण्यास विनंती केली. सुनावणीच्या वेळी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीकडे दिलेल्या पॅकिंग मशिन करीता वैधमापन विभागाकडील प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता, याबाबत त्यांना अवगत नसून तसे प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीमधील स्टोअरेज टँकच्या कॅलिब्रेशन प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता, तेही त्यांच्या कंपनीकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. सदर दोन्ही कॅलिब्रेशन प्रमाणपत्रबाबत मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी बरोबरच्या करारनाम्यात

आवश्यक असल्याचे नमूद असल्याबाबत निदर्शनास आणून दिले असता, ही बाब त्यांनी मान्य केली आहे. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने त्यांच्या कंपनीमधील स्टोअरेज टाक्यांचे कॅलिब्रेशन प्रमाणपत्र २८/०३/२०१२ रोजीचे दिनांकित प्रमाणपत्र सादर केले आहे. म्हणजेच तपासणीपूर्वीच्या कालावधीमध्ये सदर पॅकिंगची प्रक्रिया विना कॅलिब्रेशन प्रमाणपत्राची झाली असल्याबाबत उपस्थित अधिकाऱ्यांना निदर्शनास आणुन दिले असता, सदर बाबही सुनावणीस उपस्थित अधिकाऱ्यांनी मान्य केली आहे.

सदर तपासणीच्या वेळी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या वतीने उपस्थित द्वारकानाथ राठी व महेश राठी यांनी तपासणीच्या कामात वारंवार हस्तक्षेप करुन पर्यायाने शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. तपासणीमध्ये मे. एस.टी.सी. या कंपनीच्या वतीने साठ्याची मोजदाद करण्याकरिता नेमणूक करण्यात आलेल्या अधिकृत सर्वेअर्सना पंचासमक्ष पाचारण करण्यात आले व सदर सर्वेअर्सनी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी व वेअरहाऊसमधील पामतेलाच्या साठ्याची उपस्थित अधिकारी, पंच तसेच द्वारकानाथ राठी व महेश राठी यांचेसमक्ष प्रत्यक्ष साठ्याची मोजदाद करुन एकुण ७३९२२ पामतेलाचे बॉक्स असल्याचे सांगुन त्यांनी स्टॅगनिहाय नमूद केलेल्या आकडेवारीच्या अहवालावर स्वत:च्या स्वाक्षरीसह प्रमाणित केले आहे. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे उपस्थित प्रतिनिधी यांना तपासणीच्या वेळी मे. एसटीसी कंपनी या भारत सरकारच्या अंगिकृत उपक्रम असलेल्या कंपनीकडुन महाराष्ट्र शासन, सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत करावयाचा पामतेलाचा अनुदानीत साठा प्राप्त करुन घेत असल्याचे आढळून आले आहे. मे. श्री सप्तश्रृंगी या कंपनीच्या वतीने सादर केलेल्या लेखी निवेदनासोबत त्यांनी कंपनीमध्ये ९ टाक्यांचे साठवणूक क्षमता दर्शविणारे वैधमापन शास्त्र विभागाचे दिनांक २८/०३/२०१२ रोजी निर्गमित केलेल्या पडताळणी प्रमाणपत्र क्र. २७५८२६ सादर केले आहे. तथापी, घटनास्थळी दिनांक २८/०३/२०१२ रोजी मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीच्या प्रतिनिधींनी सदर टाक्यांचे कॅलिब्रेशन नसल्याचे कबूल केले होते. सदर प्रमाणपत्राचे अवलोकन करता दि.२८/०३/२०१२ या दिवशी तपासणीकरुन त्याबाबतचे शुल्काची रक्कम स्विकारुन त्याच दिवशी प्रमाणपत्र निर्गमित केल्याचे आढळून आल्याने या कार्यालयाकडून नियंत्रक वैधमापन शास्त्र यांना निर्गमित केलेल्या पत्रान्वये सदर प्रमाणपत्राची सत्यता पडताळून तसेच मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने यापूर्वीच्या कालावधीत कॅलीब्रेशन प्रमाणपत्र प्राप्त करुन न घेतल्याने सदर बाबत त्यांच्या स्तरावरुन दि लीगल मेट्रोलॉजी (पॅकेज कमोडिटीज) रुल्स, २०११ चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द योग्य ती पुढील कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचा मे. एसटीसी या कंपनीसोबत झालेल्या करारनाम्यातील सप्तश्रृंगीच्या जबाबदाऱ्यांमध्ये नमुद अट क्र. I (आय) मध्ये मे. एसटीसी या कंपनीकडून पुरविण्यात येणारा पामतेलाचा सुटा साठा हा स्वच्छ कॅलिब्रेशन केलेल्या टाक्यांमध्येच साठवणूक करणे आवश्यक

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE MUMBAI

असल्याचे नमुद आहे. म्हणजेच दिनांक २८/०३/२०१२ पूर्वीच्या कालावधीत सदर कंपनीत होत असलेल्या पॅकिंगची प्रक्रिया ही विना कॅलिब्रेशन सर्टिफिकेटची झाली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे यापुर्विच्या कालावधीत होत असलेल्या पामतेलाच्या पॅकींगमध्ये प्रत्यक्षात विहीत परिमाणापेक्षा कमी क्षमतेची पॅकिंग झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने द्विपक्ष कराराचे भंग केल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळेच तपासणीच्या वेळी एकुण २८७३ पामतेलाचे बॉक्स मधील ३९.२१ मे. टन साठा हा उपस्थित पथकास अतिरीक्त आढळून आल्याचे निष्पन्न झाले आहे.

दिनांक २८/०३/२०१२ व २९/०३/२०१२ रोजी तपासणीचे दिवशी मे. एसटीसी या कंपनीच्या अधिकाऱ्यांना तपासणी बाबत माहित असुन सुध्दा कंपनीचे वतीने कोणीही अधिकारी घटनास्थळी उपस्थित राहीले नाहीत ही बाब संभ्रमः निर्माण करणारी आहे. वास्तविक पाहता मे. एसटीसी कॉर्पोरेशन ऑफ इंडीया लि. या कंपनीच्या मुंबई विभागातील अधिकाऱ्यांकडून मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीस नियमित भेट देऊन तपासणी करणे आवश्यक असताना त्यांनी मे. सुपरीटेंन्ड्स कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या खाजगी कंपनीकडे जबाबदारी सोपवून सदर कंपनीने सादर केलेल्या दैनिक मोजदाद अहवालावर ते अवलंबुन असल्याचे दिसून येत असल्याने वरील सर्व प्रकरणात मे. एसटीसी या भारत सरकारच्या अंगिकृत उपक्रमाकडून अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे आढळते. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीस द्विपक्ष करारानुसार पामतेलाच्या पिशव्या भरण्याची मशिन तसेच लोखंडी टाक्या यांची कॅलीब्रेशन करुन घेणे गरजेचे आहे. तथापी, तपासणीच्या दिवसापर्यंत मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या वैधमापन शास्त्र या संबंधित विभागाकडील प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेतले नाही, या महत्वाच्या बाबी मे एसटीसी या कंपनीच्या अधिकाऱ्यांना अवगत असून सुध्दा त्यांनी जाणीवपुर्वक डोळेझाकपणा करुन त्यांना नेमुन दिलेल्या कर्तव्यात कसुर केल्याचे दिसून येत आहे. मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीने करारनाम्यातील अटींचा भंग केल्यावरुन शासनाची विश्वासार्हता गमावल्याचे निष्पन्न झाले आहे.

मे. श्री सप्तश्रृंगी कंपनी या कंपनीस मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन तसेच पर्यायाने शासनाकडून सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत होणारा अनुदानित दराचा पामतेलाचा साठा पॅकिंग करुन वितरणाची जबाबदारी देण्यात आली असता त्यांनी सदरच्या तपासणीमध्ये आढळून आलेले २८७३ पामतेलाचे बॉक्स (३९.२१ मे. टन) हा अतिरिक्त पामतेलाचा साठा त्यांनी संबंधित जिल्ह्यांना विहीत परिमाणामध्ये पूर्णपणे वितरीत न करता तो गैरमार्गाने व काळाबाजारी करण्याच्या उद्देशाने स्वत:जवळ बाळगून ठेवल्याने त्यांनी मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन सोबतच्या करारनाम्याच्या अटींचा भंग करुन शासनाची विश्वासार्हता गमावल्याने पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, नमुद गुन्हयामधील अतिरीक्त आढळून आलेल्या २८७३

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD O... MUMB...

0011

बॉक्स मधील ३९.२१ मे.टन पामतेलाचा साठा हा यापूर्वी दिनांक ३०/०४/२०१२ रोजी पारीत केलेले आदेश कायम करुन शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

दिनांक ३०/०४/२०१२ रोजी जप्त मद्देमालाच्या विल्हेवाटीकरिता पारीत केलेल्या आदेशान्वये सदरचा जप्त मुद्देमाल हा शासन नियंत्रित दराचा तसेच नाशवंत असल्याने तात्काळ विल्हेवाट करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने प्रचलित पध्दतीनुसार मे. आकाश ग्राहक सहकारी संस्था यांनी डिमाण्ड ड्रॉफ्ट क्र. ०२६७४६ दिनांक ०७/०५/२०१२ पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. तद्नंतर उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ हे पंच व पोलिस पथकांसमवेत सदर संस्थेने एकूण जप्त असलेल्या २८७३ पामतेलाच्या बॉक्सपैकी ७०० पामतेलाच्या बॉक्सची अधिकृत शिधावाटप दुकानांना त्यांना नियत केलेल्या परिमाणानुसार शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यासाठी उचल करुन वितरण केले आहे. सद्य:स्थितीत नमूद वेअरहाऊसमध्ये २१७३ बॉक्समधील शासन नियंत्रित दराचा पामतेलाचा साठा शिल्लक आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. II २७/२०१२ दिनांक २९/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या २८७३ बॉक्समधील ३९.२१ मे. टन पामतेलाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेला अनुदानीत दराचा पामतेलाचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांना, पात्र शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित दराने वितरीत करण्याकरिता द्यावा व येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) उपरोक्त कार्यवाही करतांना उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांनी उपरोक्त पामतेलाचा साठा संबंधित अधिकृत शिधावाटप दुकानांच्या नियतनामध्ये दर्शविण्यात यावा.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. श्री सप्तश्रृंगी कंपनीचे मालक
२) मे. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. चे व्यवस्थापक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, वाशी, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच जप्त मुद्देमाल हा नाशवंत असल्याने सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांना माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) कार्यासन अधिकारी, मागणी शाखा, का.क्र. २, प्रधान कार्यालय यांना माहिती व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
६) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.